नियमित दिवाणी दावा क्र. ८८/२०१०

सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००३८०–२०१०

निशाणी क्र.२७९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी तर्फे कथन असे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१० सुरेखा नामदेव तावडे ही दि.१२/०६/२०२५ रोजी मयत झालेली आहे. तिचे वारस प्रतिवादी क्र.७, ८, ९ येथे दाखल आहेत. तरी प्रतिवादी क्र.१० हिचे नाव दाव्यातून कमी करणेस व त्याप्रमाणे त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदर कामी नि.क्र.२८१ सोबत प्रतिवादी क्र.१० सुरेखा नामदेव तावडे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१० या मयत असल्याचे दिसून येते. वादी यांच्या कथना नुसार प्रतिवादी क्र.१० यांचे वारस पुर्वीपासूनच अभिलेखावर आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१० यांचे निराळे वारस अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. वादी यांच्या अर्जातील कथनांचा विचार करता वादी मागणी करतात त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास कोणतीही अडचण दिसत नाही. तसेच दाव्यात वादी मागणी करतात त्याप्रमाणे दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. याउलट दावा

मिळकती मधील वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण होण्यासाठी वादी यांनी अर्जात दिल्या प्रमाणे दुरुस्ती करणेस हरकत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.२७९ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत प्रस्तुत अर्जात नमुद केल्या प्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.24 15:34:58 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः २४/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड